महाराष्ट्र शासन
ग्रामविकास विभाग
बांधकाम भवन,२५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई-४०० ००१.

---

Email ID:- itcell-rdd@mah.gov.in
संकेतस्थळ:- rdd.maharastra.gov.in
संकीर्ण-२४२६/प्र.क्र.१५०/मातंक
दिनांक:- २४ सप्टेंबर, २०२६.

---

प्रति,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सर्व.

**विषय**-भारत सरकारच्या समर्थ पंचायत पोर्टलवर (Samarth Panchayat Portal) आपल्या जिल्ह्यातील ग्रामपंचायतींच्या महसुलाची माहिती अद्ययावत करणेबाबत

**संदर्भ**- १) कार्यालयीन आदेश जा.क्र. संकीर्ण-२४२६/प्र.क्र.१५०/मातंक दिनांक-२३/०९/२०२६
२) समक्रमांकाचे शासन पत्र दि. २३.०९.२०२६

१६ व्या वित्त आयोगाच्या शिफारशींच्या अनुषंगाने ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या स्व उत्पन्न महसुल (ओन सोर्स ऑफ रिव्हेन्यू-OSR) संकलनाला बळकटी देण्यासाठी, पंचायती राज मंत्रालय, भारत सरकार मार्फत **समर्थ पंचायत पोर्टल** (SAMARTH Panchayat Portal) हे एकात्मिक डिजिटल व्यासपीठ विकसित करण्यात आले आहे. या पोर्टलच्या माध्यमातून ग्रामपंचायतींचे कर व करेतर महसूल संकलन, मागणी सूचना, कर नोंदवह्या आणि रिअल-टाइम अहवाल याचे प्रभावी व्यवस्थापन करणे अपेक्षित आहे.

या अनुषंगाने पंचायतीराज मंत्रालय यांच्या मार्फत -समर्थ पंचायत पोर्टल॰ विकसित करण्यात आले असून, पंचायतींना त्यांच्या स्वतःच्या उत्पन्न महसूलाचे (OSR) संकलन व संनियंत्रण करण्यासाठी हे एक युनिफ़ाईड डिजिटल प्लॅटफ़ॉर्म म्हणून कार्य करणार आहे. सदर पोर्टलच्या माध्यमातून कर मागणी सूचना/डिमांड नोटीसेस जारी करणे, त्याचे अदायागीचा/पेमेंटचा मागोवा घेणे व कर नोंदवही/टॅक्स रजिस्टर्सचे व्यवस्थापन करणे सुलभ होणार आहे.

तसेच, स्वामित्व (SVAMITVA) योजनेंतर्गत उपलब्ध मालमत्ता विषयक माहितीचे समर्थ पंचायत पोर्टल सोबत इंटेग्रेशन केल्यामुळे मिळकत कराचे अधिक अचूक व स्वयंचलित निर्धारण (ॲटोमेटेड ॲसेसमेंट) करण्यास सहाय्य होणार आहे.

Scanned with CamScanner

१६व्या वित्त आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार स्व उत्पन्न महसुलाची-OSR संदर्भातील माहिती वेळेत आणि सर्वंकशरित्या डेटा अपलोड (टाइमली अँड कॉम्प्रेहेन्सिव्ह डेटा अपलोड) करणे आवश्यक असून, ग्रामपंचायतींनी वार्षिक महसूल नियोजन दरवर्षी समर्थ पंचायत पोर्टलवर अपलोड करणे यापुढे अनिवार्य आहे.

सदर पोर्टलचे राज्यस्तरावरुन संनियंत्रण करण्यासाठी संचालक,पंचायत राज, पुणे हे नोडल अधिकारी म्हणून कार्यरत असणार आहेत. तर या पोर्टलसाठी राज्य समन्वयक म्हणून श्री अनिल बगाटे, ग्राम विकास अधिकारी यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. सदरच्या समर्थ पोर्टलवर ग्रामपंचायतींचे प्रोफ़ाईल तयार करण्यासाठी त्यांचेशी (८८०५०१३५०४) या भ्रमणध्वनी क्रमांकावर जिल्ह्यांनी संपर्क साधावा.

**सदरच्या समर्थ पंचायत पोर्टलवर आपल्या जिल्ह्यातील ग्रामपंचायतींच्या स्व उत्पन्न महसुलाची माहिती अद्ययावत करण्यासाठी खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत:-**

१. आपल्या जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींना समर्थ पंचायत पोर्टलची उद्दिष्टे व उपयोग याबाबत अवगत करण्यात यावे. (उदा. करमागणी, ऑनलाईन/ऑफलाईन करवसुली इ.)

२. ग्रामपंचायतींच्या स्व उत्पन्न महसुलाची (OSR) अंतर्गत येणा-या कर, करेतर सेवा व वापरकर्ता शुल्क यांची माहिती या समर्थ पंचायत पोर्टलवर अचुक व उद्ययावत स्वरुपात नोंदविण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी. करांचे प्रकार, कर व सेवांची फी आणि महसुल संकलनाशी संबंधित माहिती नियमितपणे अद्ययावत ठेवावी.

३. ग्रामपंचायतीकडील मिळकत कर, स्वच्छता कर, वीज कर, पाणीपट्टी, बाजार शुल्क, सेवा शुल्क इत्यादी उपलब्ध महसुल स्त्रोतांची माहिती योग्यरित्या नोंदविण्याबाबत ग्रामपंचायतींना मार्गदर्शन करण्यात यावे.

४. केंद्रशासनाच्या १६ व्या वित्त आयोगांतर्गत कामगिरी अनुदान (परफ़ॉर्मन्स ग्रॅन्ट) ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद व राज्य स्तरावर मिळणेसाठी सर्व ग्रामपंचायतींनी समर्थ पंचायत पोर्टल मार्फत कर मागणी नोटीस तयार करणे व या माध्यमातुनच करवसुली करणे अनिवार्य असुन त्याआधारेच पुढील कामगिरी अनुदानासाठी आवश्यक पात्रतेचे निकष पंचायती पूर्ण करणार आहेत.

५. ग्रामपंचायतींच्या संकलित होणा-या महसुलाची रक्कम समर्थ पंचायत पोर्टल वर दर्शविण्यासाठी राज्यस्तरावरून राज्य नोडल बँकेची माहिती यथावकाश जिल्ह्यांना कळविणेत येईल. त्या बँकेसोबत पंचायतींचे बँक खाते जोडुन पंचायतीचा महसुल केंद्र शासनाच्या या पोर्टलवर उपलब्ध होईल.

६. यासाठी सन २०२६-२७ पासुनची पंचायतींच्या महसुलाची माहिती समर्थ पंचायत पोर्टल वर अपलोड करुन कार्यवाही करावी.

७. समर्थ पंचायत पोर्टल (https://samarthpanchayat.gov.in/) साठी ई-ग्रामस्वराज पोर्टलसाठी वापरात असलेला अॅडमिन युजर आयडी व पासवार्डचा वापर सर्व स्तरावर करावा.

Scanned with CamScanner

८. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायती समर्थ पंचायत पोर्टलचा वापर करत असलेबाबत खात्री करुन १६ व्या वित्त आयोगाचे कामगिरी अनुदान मिळणेसाठी आपल्या जिल्ह्यातील पंचायती पात्र ठरतील याबाबत पाठपुरावा करणे आवश्यक आहे.

९. या पोर्टलवर महसुलाची माहिती भरण्यासाठी प्रथम टप्प्यातील कामकाज म्हणून ग्रामपंचायतींच्या मिळकतधारकांची माहिती/प्रोफ़ाईल या पोर्टलवर अपलोड करण्याची कार्यवाही पूर्ण करुन घ्यावी. त्याकरिता अवश्यक सहाय्य घेण्यासाठी उक्त उल्लेखित राज्य समन्वयक यांचेशी संपर्क साधावा.

**१०. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत ऑनलाईन मागणी/वसुली अहवाल तयार करण्यासाठी सदरचे पोर्टल ग्रामपंचायतींना उपयुक्त ठरणार आहेत.**

(डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार)
सचिव
ग्रामविकास व पंचायत राज
महाराष्ट्र शासन

प्रत-

१. उप सचिव (मातंक), ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई.
२. उप सचिव (पंचायतराज), ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई.
३. संचालक, पंचायत राज, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस्तव व कार्यवाहीस्तव
४. संचालक तथा उप महासंचालक, राज्य ग्रामीण विकास संस्था, यशदा, पुणे यांना माहितीस्तव
५. अपर आयुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालये(सर्व) यांनी आपल्या विभागाचे जिल्ह्यातील सदरचे काम तातडीने यशस्वीरित्या पूर्ण करुन घेण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी.

Scanned with CamScanner